संच : क

# ५ वी मराठी

**महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे-३०.**

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र**

**शैक्षणिक प्रगती चाचणी**

**पायाभूत चाचणी २०१७-१८ : इयत्ता - पाचवी**

**विषय : मराठी (लेखी)**

**विद्यार्थ्याचे नाव :** ______________________________

**शाळेचे नाव :** ______________________ **दिनांक :** / /२०१७

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **प्राप्त गुण :** [ ]

**हजेरी क्रमांक :** [ ] **तुकडी :** _____ **शिक्षकाची स्वाक्षरी** _______ **एकूण गुण :** ४०

---

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______________ २) ______________

३) ______________ ४) ______________

५) ______________ ६) ______________

७) ______________ ८) ______________

९) ______________ १०) ______________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

> आईचे बोलणे ऐकायला मोहन घरात नव्हताच. तो भरदुपारी रस्त्यावरून अनवाणी धावत होता. तो दुकानात गेला. दुकानदार एकटाच हिशेब करत बसला होता. मोहनने दुकानदाराला ती पन्नास रुपयांची नोट परत केली. म्हणाला, ''सॉरी! माझी चूक झाली. सकाळी मला तुमच्याकडून जास्ती पैसे आले. मला यायला उशीर झाला.'' दुकानदार हसला. त्याने मोहनला शाबासकी दिली. समोरच्या बरणीतले एक चॉकलेट काढून त्याने मोहनसमोर धरले.
>
> मोहनने हात जोडून पुन्हा एकदा 'सॉरी' म्हटले आणि चॉकलेट न घेताच त्याने घराकडे धूम ठोकली. धापा टाकतच मोहन घरात शिरला. त्याला नीट बोलताही येईना. त्याला खूप भरून आले होते. त्याने आईचा हात हातात घेतला आणि म्हणाला, ''होय, मी सुद्धा स्वाभिमानी आणि प्रामाणिक आहे तुझ्यासारखा ! होय, मी सुद्धा!''

**प्रश्न २.** मोहन कोणत्यावेळी रस्त्यावरून अनवाणी धावत होता? (गुण १)
योग्य पर्यायाला गोल कर.

अ) सकाळी

ब) संध्याकाळी

क) दुपारी

**प्रश्न ३.** मोहनला खूप दम लागला होता. हे तुला कोणत्या वाक्यावरून समजले? (गुण २)

______________________________

______________________________

**प्रश्न ४.** मोहनचे कोणते गुण या उताऱ्यातून तुला समजले ते लिही. (गुण २)

______________________________

______________________________

______________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-II\19-06-17\G*

## संच : क

**प्रश्न ५ ते ७ साठी :** ही कविता वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

### धूळपेरणी

असो बरकत धूळपेरणीला,
लागला मातीचा जीव झुरणीला
हिरव्या पिसांचा ध्यास धरणीला,
टिपूर मोत्यांची आस मोरणीला
येऊ नये कधी दिवस जाचक
कासावीस डोळे बनले चातक
कोरडे नक्षत्र पूर पापणीला,
आलेलं आभूट दूर दाटणीला
मिळता डोळ्यांना मेघुट इशारे,
मातीच्या कणांना फुटले धुमारे

(अशोक कौतिक कोळी)

**प्रश्न ५.** धरणीला कशाचा ध्यास आहे? (गुण १)

______________________________

**प्रश्न ६.** 'मातीच्या कणांना फुटले धुमारे' याचा अर्थ काय? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) पावसामुळे मातीच्या कणांमधून सुगंध येत आहे.

ब) मातीच्या कणांमधून झाडाला नवीन पालवी फुटणे.

क) मातीच्या कणांवर ऊन पडल्याने ते सोनेरी भासत आहे.

**प्रश्न ७.** पाऊस पडला नाही तर काय होईल असे तुला वाटते? (गुण २)

______________________________

______________________________

______________________________

______________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-II\19-06-17\G

## संच : क

**प्रश्न ८ ते १० साठी :** खालील जाहिरात वाच. त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.



**प्रश्न ५.** जाहिरात कशाची आहे? (गुण १)

अ) बालजत्रा ब) बालनाट्य क) पुस्तक प्रदर्शन

**प्रश्न ६.** नाटक कोणासाठी आहे? हे तुला कशावरून कळते? (गुण २)

______________________________

______________________________

**प्रश्न ७.** आजच तिकिट खरेदी करा, असे जाहिरातीत कशामुळे सांगितले असेल? (गुण २)
उद्या तिकिट खरेदी केले तर चालेल का?

______________________________

______________________________




\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-II\19-06-17\G

## संच : क

**प्रश्न ११ ते १३** मध्ये दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दाऐवजी कंसातील शब्द वापर. आवश्यक बदल करून वाक्य पुन्हा लिही.

**प्रश्न ११.** शबानाने भाजी आणली. (कपडे) (गुण १)

______________________________

**प्रश्न १२.** सखारामकडे शेळी होती. (शेळ्या) (गुण १)

______________________________

**प्रश्न १३.** उद्या आम्ही बागेत जाऊ. (काल) (गुण १)

______________________________

**प्रश्न १४.** 'चाहूल लागणे' या वाक्प्रचाराचा वापर करून वाक्य लिही. (गुण १)

______________________________

______________________________

**प्रश्न १५.** खालील शब्दांना प्रत्यय लावून तयार होणारा प्रत्येकी एक शब्द लिही.

जसे : वान- शीलवान (गुण १)

१) दार : ______________________________

२) ता : ______________________________

**प्रश्न १६.** खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

अरे! जरा मला दुकानातून डाळ तांदूळ आणि साखर आणून दे

______________________________

## संच : क

**प्रश्न १७.** खालील वाक्यांचा योग्य क्रम लावून वाक्ये पुन्हा लिही. (गुण २)

बाबांनी रमाचे शिक्षण अडचणीमुळे बंद केले.

गावात चौथीपर्यंतच शाळा होती.

मुख्याध्यापकांनी बाबांची समजूत घातली.

रमा पुन्हा आनंदाने शाळेत जाऊ लागली.

रमाला शाळेची खूप आवड होती.

**प्रश्न १८.** 'तीर' या शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ लक्षात घेऊन प्रत्येक अर्थाचे एक वाक्य लिही. (गुण २)

जसे : पाट – नानी पाटावर बसली. (अर्थ : पाट – बसण्यासाठीचा पाट)

पाट – शेताला पाटाने पाणी देतात. (अर्थ : पाट – शेतातील पाणी वाहण्यासाठीचा मार्ग)

## संच : क

**प्रश्न १९.** खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे एक गोष्ट लिही. (गुण ५)

सलमाची आई भाजी घेण्यासाठी बाजारात गेली होती. आकाशात अचानक ढग दाटून आले. सोसाट्याचा वारा सुटला. सलमा घरात एकटीच बसली होती. अचानक..........

## संच : क

**प्रश्न २०.** खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही. (गुण ५)

बैलजोडी, गाढव, मेहनती, आळशी,



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-II\19-06-17\G